## *रेग्युलर कज्जा क्रमांक १४२/२०१४*

## निशाणी १४ खालील आदेश.

प्रस्तुत कामी त्रयस्थ अजर्दार यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांना त्रयस्थ अर्जदार क्रमांक ५ व ६ या कामी आवश्यक पक्षकार म्हणून सामील करावे यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ क्रम १० प्रमाणे दाखल केला आहे.

२. यातील मुळ वादी यांनी निशाण २३ वर त्यांचे म्हणणे देवून अर्जास तीव्र हरकत घेतली आहे. मुळ वादी यांचे असे कथन आहे की, त्रयस्थ अर्जदार हे त्यांचे भाउबंद नाहीत तसेच ते दावा मिळकतीचे सह हिस्सेदार अथवा कब्जेदार नाहीत. वादीने दावा वाटपाकरिता केलेला आहे त्यामुळे ति-हाईत इसम हे वाटपाच्या दाव्यात आवश्यक पक्षकार होवून शकत नाहीत त्यामुळे ति-हाईत इसम यांनी दाखल केलेला अर्ज रद्द करणेत यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. त्रयस्थ अर्जदार तर्फे श्री.व्ही.एम.केळकर वकिल व मुळ वादी तर्फे श्री.ए.एस.मिसाळ वकील अथवा वादी यांना ५.४५ पर्यंत पुन्हा पुन्हा पुकारा केला असता गैरहजर.

४. त्रयस्थ अर्जदार यांचा अर्ज व वादी यांचे म्हणणे लक्षात घेता खालीलप्रमाणे मुद्दे व त्याच्या अनुषंगाने कारणांसहित स्पष्टीकरण व आदेश मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| १. त्रयस्थ अर्जदार या कामी आवश्यक पक्षकार आहेत का ? | होय |
| २. काय आदेश ? | मंजूर करणेत येत आहे. |

## कारणमिमांसा.

## मुद्दा क्रमांक १ व २ करिता.

५. त्रयस्थ अर्जदार यांनी असे कथन केलेले आहे की, दावा मिळकतीचे वादी व प्रतिवादी यांचेमध्ये दिनांक २०.०७.२०११ पुर्वी सरस निरस मानाने तोंडी वाटप झालेले असताना देखील वादी व प्रतिवादी यांनी संगनमताने लबाडीने मे.कोर्टासमोर वस्तुस्थिती लपवून ठेवली आहे. प्रतिवादी नं. ३ यांनी ति-हाईत इसम यांना दिनांक ३०.०१.२०१३ रोजी त्यांचे हक्कात खरेदीपुर्व करारपत्र व दिनांक ०६.१२.२०१३ रोजी पुरवणी करारपत्र करुन दिलेले आहे. त्यापोटी ति-हाईत इसम यांनी प्रतिवादी नं. ३ यांना रक्कम रुपये १५,००,०००/- इतकी रक्कम संचकारापोटी दिलेली आहे. परंतु ठरलेप्रमाणे खरेदीपत्र करुन देत नसलेने व टाळाटाळ करीत असलेचे प्र.वादी यांचे लक्षात आलेनंतर त्यांनी मे.दिवाणी न्यायालय,वरिष्ठ स्तर,कोल्हापूर यांचे न्यायालयात स्पे.क.नं. ९४/२०१४ चा दाखल केला असलेचे बाब वादी प्रतिवादी यांना ज्ञात आहे. सदर स्पे.कज्जा क्रमांक ९४/२०१४ ची लिस पेंडन्सी नोटीसची नोंद ति-हाईत इसम दुय्यम निबंधक कार्यालय, हातकणंगले येथे दस्त क्र. ६४८२/२०१४ ने नोंदविली आहे. त्यामुळे सदर लिस पेंन्डस दस्तांची नोंद महसुल सदरी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम १४९ प्रमाणे सदरी नोंद होणार याची कल्पना आल्यामुळे प्रतिवादी नं. ३ यांनी वादी व इतर भावांशी संगनमत करुन दावा दाखल केलेला आहे.

६. त्रयस्थ अर्जदार यांनी त्यांचे कथनांचे पृष्टर्थ नि. १६ सोबत हजर केलेले अ.नं.१. मौ.अंबप येथील गट नं. ६२४ चा सातबारा उतारा ,अ.नं.२. खाते नं. ५९६ चा उतारा, अ.नं.३. ग.नं. ६२४ चे अभिलेख सदरी मंजूर वाटप फेरफार नं. ९५३९, अ.नं.४. वादी व प्रतिवादी यांचे

दरम्यान दि. २०.०७.२०११ रोजीचे वाटपाचे स्मरणटिप्पण तसेच अ.नं. ५ ला तह.रजि.नं. २१९/१४-१५ मधील निकालाची समज असे कागद हजर केलेले आहेत. सदर कागदपत्रांचे अवलोकन करता त्रयस्थ अर्जदार यांनी दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,कोल्हापूर येथे स्पेशल कज्जा कमांक ९४/२०१४ चा दावा प्रतिवादी नं.३ यांचेविरुध्द दाखल केलेचे दिसून येते. सदरचा दावा हा खरेदीपत्र पुर्ण होवून मिळणेसाठीचा दाखल आहे. तसेच प्रथमदर्शनी वादी, प्रतिवादी यांचेमध्ये वाटप झालेबाबतचा फेरफार उतारा हजर केलेचे दिसून येते. वादी यांनी त्यांचे दावामध्ये सदर स्पे.क.नं. ९४/२०१४ चा दावा प्रलंबित असलेचे कथन लपवून ठेवलेचे दिसून येते. तसेच यातील त्रयस्थ इसम यांनी असे गंभीर कथन केलेले आहे की, त्यांनी वादी,प्रतिवादी यांचेविरोधात स्पेशल केस नं. ९४/२०१४ मध्ये तुर्तातुर्त मनाई आदेश मिळविलेला आहे. तसेच त्रयस्थ इसम यांनी प्रतिवादी क्रमांक ३ यांना रक्कम रुपये १५,००,०००/- (पंधरा लाख फक्त)संचकार करारापोटी दिलेचे गंभीर कथन केलेले आहे. याउलट वादी यांनी त्यांचे म्हणणेचे पृष्टर्थ कोणतेही दस्तऐवज दाखल केलेले नाहीत. त्यामुळे सदर दाव्याचे कामी त्रयस्थ अर्जदार यांना पक्षकार म्हणून सामील करणे आवश्यक असल्याचे मतावर मी येत आहे. तसेच सदर संचकार पत्राबाबत,वाटपाबाबतची कथने गुणदोषावरती दाव्याच्या चौकशीचे वेळी ठरणार आहे. परंतू त्रयस्त अर्जदार यांना दाव्याचे या क्षणी त्यांनी हजर केलेली नि.१६ सोबतचे कागदपत्र त्यांना दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार म्हणून सामील करणेस पुरक आहेत. त्यामुळे अशाप्रकारे त्रयस्थ अर्जदार यांना दाव्याचे कामी पक्षकार म्हणून सामील केलेस वादी, प्रतिवादी यांचे प्राथमीक दृष्टया काही नुकसान होणार नाही.त्यामुळे त्रयस्थ अर्जदार यांचा अर्ज या स्थितीत प्रथमदर्शनी मंजूर होणेस पात्रआहे.त्यामुळे मी खालीलप्रमाणे मुद्दा क्रमांक १ साठी होकारार्थी निष्कर्ष नोंदवून मुद्दा क्रमांक २ साठी खालीलप्रमाणे आदेश

करीत आहे.

**<u>आदेश.</u>**

१. निशाणी १४ चा अर्ज मंजूर करणेत येत आहेत.

२. वादी यांनी अर्जाप्रमाणे दुरुस्ती करुन न्यायालयीन अभिलेखावर त्रयस्थ अर्जदार यांना प्रतिवादी क्रमांक ५ व ६ म्हणून या कामी सामील करणेत यावे व तशी दुरुस्ती करुन दुरुस्तीप्रत हजर करावी.

सही/-

दिनांक-०१.०८.२०१६.

(एस.एम.जाधव),
दुसरे सह.दिवाणी न्यायाधिश,क.स्तर.
पेठ वडगांव.